2015-16 MR

6/2015

Seminar Proceedings

UGC

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Sponsored Two Day National Seminar on

# Female Foeticide and Human Right of Gender Justice

5th & 6th September 2015.



Organized by

**IQAC**

M.S.P. Mandal's

## Shri Shivaji Law College, Parbhani

Affiliated to S.R.T.M. University, Nanded B.C.I. & UGC)

(Reaccredited by NAAC with B Grade)

330



Scanned by TapScanner

# स्त्री–भ्रूणहत्या एक ज्वलंत सामाजिक समस्या

प्रा.मेघराज रा.शिंदे
कला व विज्ञान महिला महाविद्यालय, मेहकर,
जि.बुलडाणा.

**प्रस्तावना :**

पुरोगामी महाराष्ट्रात उमलू पाहणा–या कळयांना गर्भातच नष्ट करण्याच्या प्रयत्नाने थैमान घातले आहे. या मानसिक विकृतीचे निदान करुन त्यावर उपाययोजना करण्याची वेळ आल्याचे चित्र जनगणना २०११ वरुन स्पष्ट होते. दिवसेंदिवस ० ते ६ वयोगटातील मुलांची संख्या घटत आहे. स्त्री भ्रूणहत्या व त्यामागची मानसिकता हा एक सामाजिक रोग होय. त्याचा प्रादुर्भाव आज सर्वत्र जसे शहरी–ग्रामिण, श्रीमंत–गरीब, शिक्षित–अशिक्षित, विकसित–अविकसित सर्वच भेदांना ओलांडून होत आहे. अलिकडे मराठवाडयातील परळी–वैजनाथ येथील एका नाल्यात नऊ स्त्री अर्भके सापडली. या घटनेने सर्वत्र खळबळ झाली. हा प्रश्न ऐरणीवर आला. एवढेच नव्हे तर विद्येचे माहेरघर असलेल्या, फुले आणि कर्वे यांच्या पुण्यात गर्भलिंग चाचणीचा अमानवी प्रकार उघडकीस आला. मुलगी होणार असल्याचे निदान करुन तो गर्भ मारुन टाकण्याचे काम करणा–यांमध्ये शिकलेल्यांची संख्या जास्त आहे. हा खरा चिंतेचा विषय आहे. त्यासाठी कृतीशिल लढयाची गरज निर्माण झाली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :–**

१. स्त्री – पुरुष समानता निर्माण करणे.
२. स्त्रीयांचा समाजातील दर्जा उंचावणे.
३. मुलीबाबत समाजाची असलेली मानसिकता बदलणे.
४. भविष्यात होणा–या अनैतिक परिणामांपासून देशाला वाचविणे.
५. भ्रूणहत्येचे परिणाम स्पष्ट करणे.

**संशोधनाच्या पध्दती :–**

प्रस्तुत संशोधनासाठी ऐतिहासिक दस्ताऐवजाचा आधार घेण्यात आला आहे. समाजात घडणा–या घटनांची माहिती मिळवून विश्लेषणात्मक पध्दतीच्या आधारे प्रस्तुत संशोधन केले आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा आधार घेतला.

**संशोधनाची गृहीतके :–**

१. आजही समाजात 'मुलगाच हवा' अशी विचारसरणी अस्तित्वात आहे.
२. मुलगाच हवा यामध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे.
३. गर्भलिंग चाचणी करणा–यांमध्ये शहरी व सुशिक्षितांचे प्रमाण जास्त आहे.

का मारतो आपण मुलीला आईच्या गर्भात ? ती ओझं आहे म्हणून ? लग्नासाठी खर्च करावा लागेल म्हणून ? समाजात प्रतिष्ठा मिळावी म्हणून ? पण निश्चितच जन्म घेण्याअगोदर एक कालची मुलगी आजच्या मुलीला हे जग दाखविण्यापूर्वी अगदी सहजतेने गर्भपात करते. म्हणून देशात दरवर्षी १० लाख मुलींची गर्भातच हत्या होते. ही हत्या आपल्या देशातच होते असे नाही. न्यू जर्सी (अमेरिका) येथेही स्त्री गर्भाची हत्या होते. आपल्या देशातील पंजाब, हरियाणात ही समस्या गंभीर आहे.

**समाज सुधारणेची आवश्यकता :–**

महाराष्ट्रात पुण्यात सावित्रीबाई फुले, महात्मा फुले आणि महर्षी कर्वे यांनी शिक्षणाचा प्रसार केला. शिक्षणाने अनेकांचा आर्थिक स्तर उंचावला, मात्र त्यांच्या पुरुषप्रधान मानसिकतेने महापुरुषांच्या जीवननिष्ठेचा पराभव केला. महाराष्ट्रातील मुलींचे प्रमाण एक हजार मुलांमागे ८८३ असे झाले आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या मानाने आर्थिक व शैक्षणिकदृष्टया मागे असलेल्या गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्हयात मुलींचे प्रमाण जास्त आहे. त्यांच्या कार्यपध्दतीवर आसुड ओढण्याची आवश्यकता आहे. ४ डिसेंबर १८८४ ला महात्मा ज्योतिबांनी तत्कालीन गव्हर्नरला पत्र लिहून विधवा मातांच्या संततीच्या हत्येस आर्यसंस्था जबाबदार असल्याचे म्हंटले

**भ्रूणहत्या म्हणजे काय ?**

भ्रूण म्हणजे गर्भ व हत्या म्हणजे ठार करणे. गर्भातच जीवाला ठार करणे म्हणजे भ्रूणहत्या होय. भारतीय संस्कृती व धर्मशास्त्रे 'याला महापातक' मानतात. तेंव्हा ती भ्रुणहत्येला प्रोत्साहन देणार नाही हे सूर्य प्रकाशाएवढे सत्य आहे. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जगभर साजरे करण्यात आले आणि या वर्षी भ्रुणहत्या करण्याचे तंत्र उदयाला आले हा केवढा विरोधाभास आहे.

**स्त्री भ्रूणहत्येचे भारतीय समाजावर होणारे परिणाम :**

गर्भजल तपासणीनंतर भ्रूण जर स्त्री असेल तर स्त्रियांना गर्भपात करण्यास तिच्या घरची मंडळी जबरदस्ती करतात. हे भ्रूण ३–४ महिन्याचे असते. गर्भपात झाल्यामुळे स्त्रिया अशक्त होतात.



Scanned by TapScanner

गर्भपातानंतर त्यांना योग्य ते उपचार व आराम मिळत नाही. कधीकधी स्त्रियांना आपले प्राणही गमवावे लागतात.

**गर्भजल परिक्षेमुळे अपत्यानंतर होणारे परिणाम :**

१. भ्रूणाची विटंबना.
२. लोकसंख्या समतोलावर प्रभाव.
३. समाजाचे सातत्य व अस्तित्वाला धोका.
४. समाजाच्या विकासावर प्रभाव.
५. स्त्रियांविरुध्दच्या हिंसाचारात वाढ.
६. गुन्हेगारीत वाढ.
७. लोकशाहीला बाधक.
८. बहुपतित्वाच्या प्रथेला चालना.

**स्त्री भ्रूणहत्या रोखण्याकरिता उपाययोजना :**

१. लिंगनिवडीस कायद्याने बंदी.
२. मुलगाच वंशाचा दिवा ही मानसिकता बदलणे.
३. समाजप्रबोधन करणे.
४. सकारात्मक संदेश समाजाला देणे.
५. कायद्याची कठोर अंमलबजावणी करणे.
६. युवक युवतींमध्ये जागरुती निर्माण करणे.

**निष्कर्ष :**

स्त्री–भ्रूणहत्येच्या समस्येने अक्राळ विक्राळ स्वरुप धारण केले आहे. स्त्री भ्रूणहत्येचे परिणाम हे व्यक्ती, समाज व राष्ट्रावर होत आहेत. या समस्येला वेळीच आळा घातला नाही तर संपूर्ण मानव जात रसातळाला जाईल?

**संदर्भ सूची :**

१. भारतीय सामाजिक संरचना आणि समस्या — डॉ.रा.ज.लोटे पिंपळापुरे पब्लिकेशन, नागपूर २०१२
२. स्त्री–पुरुष तुलना —ताराबाई शिंदे
३. दै.सकाळ – ८ मार्च २०१५

Arts & Science Mahila Mahavidyalaya
Mehkar, Dist. Buldana